K.T.S.P.Mandal's

Hutatma Rajguru Mahavidyalaya, Rajgurunagar.

Department of Economics

HOD – Dr.R.S.Shirasi

Class:- S.Y.B.Com (code 233)

Subject:- Business Economics (Macro)

व्यावसायिक अर्थशास्त्र (स्थूल)Sem III

Sub Teacher - Assi.Prof.Dhanapune S.V.

घटक :- प्रकरण– 2 राष्ट्रीय उत्पन्न

उपघटक :- राष्ट्रीय उत्पन्नाचा अर्थ व महत्व, संकल्पना,

राष्ट्रीय उत्पन्नाची गणना ; पद्धती व अडचणी

उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह ; द्वीक्षेत्र प्रतिमान

प्रकरण– 2

राष्ट्रीय उत्पन्न

2.1 राष्ट्रीय उत्पन्नाचा अर्थ व महत्व

2.2 संकल्पना

2.2 .1 स्थूल राष्ट्रीय उत्पन्न उत्पादन

2.2 2 निव्वळ राष्ट्रीय उत्पादन

2.2.3 देशांतर्गत उत्पादन

2.2 .4दरडोई उत्पन्न

2.2 .5 व्यक्तिगत उत्पन्न

2.2 .6 खर्चकरण्याजोगे किंवा उत्पन्नविनियोगक्षम उत्पन्न

2.3 राष्ट्रीय उत्पन्नाची गणना ; पद्धती व अडचणी

2.4 उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह ; द्वीक्षेत्र प्रतिमान

HRMMteEconomicsSYBCOM

प्रास्ताविक : -

समग्रलक्षी पातळीवर अभ्यासल्या जाणाऱ्या शास्त्रांमध्ये राष्ट्रीय उत्पन्न हा चल महत्त्वाचा आहे. कारण अर्थव्यवस्थेतील एकूण मागणी, एकूण उत्पादन, एकूण रोजगार वगैरे गोष्टी राष्ट्रीय उत्पन्नाच्या पातळीवरून निश्चित होत असतात. राष्ट्रीय उत्पन्नावरून अर्थव्यवस्थेच्या कामगिरीची कल्पना येते.तसेच राष्ट्रीय उत्पन्नाच्या आधारे जगातील विविध देशांच्या आर्थिक स्थितीची तुलना करता येते.त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाची गणना केली जाते किंवा अंदाज घेतला जातो. राष्ट्रीय उत्पन्नाचे गणना करण्याच्या अनेक पद्धती आहेत.मात्र राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना अनेक संकल्पनात्मक व व्यावहारिक अडचणी येतात.

या प्रकरणात राष्ट्रीय उत्पन्नाचा अर्थ, राष्ट्रीय उत्पन्नकरण्याचे महत्त्व, राष्ट्रीय उत्पन्नविषयक संकल्पना,राष्ट्रीय उत्पन्नकरण्याच्या पद्धतीव राष्ट्रीय उत्पन्न करण्यातील अडचणी हे अभ्यास घटक स्पष्ट केले आहेत. तसेच राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह आपण या प्रकरणात अभ्यासणारआहोत.

HRMtEconoSYBCOM

राष्ट्रीय उत्पन्नाचा अर्थ व महत्व

राष्ट्रीय उत्पन्न हि प्रवाह संकल्पना आहे. राष्ट्रीय उत्पन्न संकल्पनेच्या आधारे अर्थव्यवस्थेतील वस्तू व सेवांच्या प्रवाहाचे मोजमाप केले जाते. विशिष्ट कालखंडात देशात उत्पादित झालेल्या वस्तूवसेवांची मोजमाप राष्ट्रीय उत्पन्नाच्या आधारे केले

जाते. दोनमानाने राष्ट्रीयउत्पन्नाचे गणना करताना एक वर्षाचा कालावधी विचारात घेतला जातो.त्यामुळे एका वर्षाच्या कालावधीत देशात उत्पादित झालेल्या वस्तूवसेवांची गणना केली असता राष्ट्रीय उत्पन्न मिळते. राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे विशिष्ट काळातील अर्थव्यवस्थेतील वस्तू व सेवांची बेरीज होय.

राष्ट्रीय उत्पन्न संकल्पनेच्या अनेक अर्थशास्त्रज्ञांनी व्याख्या केलेल्या आहेत. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात समितीने राष्ट्रीय उत्पन्नाची व्याख्या दिलेली आहे.

व्याख्या :-

1. डॉ. मार्शल–

"देशातील श्रम व भांडवल यांच्याकडून नैसर्गिक साधनसामग्रीचा सहाय्याने मूर्त अमूर्त स्वरुपात वस्तू व सेवा यांचे काही एक संख्याइतके निव्वळ उत्पादन केले जाते निव्वळ उत्पादन हा शब्दप्रयोग करण्याचा हेतू असा की कच्च्या मालाचा वस्तूंचा केला जाणारा वापर तसेच उत्पादन प्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या संयंत्राचा घसारा येथील लक्षात घेतला आहे निव्वळ उत्पन्न काढताना हा सर्वखर्च दोन उत्पन्नातून वादा करावा लागतो व त्यात परकीय गुंतवणुकीत पासून मिळणारे उत्पन्न मिळवावे लागते हेच खरे देशाचे निव्वळ वार्षिक उत्पन्न किंवा महसूल होय."

HRMEconomicsSYBCOM

2. प्रा. पिगु–

"समाजाच्या वस्तुनिष्ठ उत्पन्नाचा जो भाग पैशाच्या स्वरूपात मोजता येतो त्याला राष्ट्रीय उत्पन्न म्हणतात अर्थातच यात विदेशातून मिळणारे उत्पन्न समाविष्ट असते."

3. प्रा.फिशर–

"अंतिम उपभोक्ता यांना त्यांच्या बहुतेक किंवा मानवी साधनसामग्रीपासून मिळणाऱ्या सेवा म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय."

4. राष्ट्रीय उत्पन्न समिती

"विशिष्ट कालखंडात उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांची दुहेरी गणना टाळून केलेले मापन म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय.

उत्पन्न गणनेचे महत्व:-

राष्ट्रीय उत्पन्नाच्या आधारे विशिष्ट कालखंडात अर्थव्यवस्थेत उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांची गणना केली जाते. या घटनेतून राष्ट्रीय उत्पन्नसंबंधीची जी आकडेवारी मिळते ती अनेक दृष्टीने उपयोगी पडते. अर्थव्यवस्थेच्या कामगिरीची

या आकडेवारीवरून कल्पना येतेच परंतु त्याचबरोबर विविध आर्थिक धोरणे आखण्याची बाबतीत राष्ट्रीय उत्पन्नविषयक आकडेवारीची मदत होते.

राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचे महत्त्व पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते.

राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचे महत्त्व पुढीलप्रमाणे -

1. अर्थव्यवस्थेतील एकूण उत्पादनाची माहिती

राष्ट्रीय उत्पन्नाचे गणना करताना एका वर्षातील अर्थव्यवस्थेतील वस्तू व सेवांची मोजमाप केले जाते. वस्तूवसेवांचे मूल्य पैशात व्यक्त करून अशी गणना केली जाते. राष्ट्रीय उत्पन्नाच्या गणनेमुळे विशिष्ट कालखंडातील अर्थव्यवस्थेतील एकूण उत्पादनाची कल्पना येते.

2. विविध क्षेत्रांची प्रगती समजते

राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना अर्थव्यवस्थेतील शेती, उद्योग ,व्यापार, वाहतूक व दळणवळण अशा विविध क्षेत्रातील वस्तू व सेवांच्या उत्पादनाची गणना केली जाते. या घटनेवरून या विविध क्षेत्राच्या प्रगतीची कल्पना येते .तसेच अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांचे तुलनात्मक महत्त्व समजण्यास मदत होते.

3. अर्थव्यवस्थेच्या वृद्धी दराची माहिती

राष्ट्रीय उत्पन्न संबंधीच्या आकडेवारीवरून देशातील राष्ट्रीय उत्पन्नाच्या वृद्धीदर या संबंधी माहिती मिळते. राष्ट्रीय उत्पन्नाचा वृद्धीदर हा अर्थव्यवस्थेचा वृद्धीदर स्पष्ट करतो. या दृष्टीने विचारकरता अर्थव्यवस्थेच्या आर्थिक वृद्धीची कल्पना येण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी महत्त्वाची ठरते.

HRMInternationalSYBCOM

4. समाजाचे आर्थिक कल्याण समजण्यास मदत

देशाचे आर्थिक कल्याण हे राष्ट्रीय उत्पन्नाची निगडित आहे .इतर परिस्थिती कायम असताना राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ ही अर्थव्यवस्थेतील आर्थिक कल्याणातील वाढ स्पष्ट करते.सहाजिकच राष्ट्रीय उत्पन्नविषयक आकडेवारीमुळे समाजाच्या आर्थिक कल्याणाची व त्यात होणाऱ्या बदलाची माहिती मिळण्यास मदत होते.

5.आर्थिक विषमता संबंधी माहिती

राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी ही देशातील राष्ट्रीय उत्पन्न लोकसंख्येच्या विविध गटात कसे विभागलेगेले आहे हेही दर्शवते. यातून राष्ट्रीय उत्पन्नातील विविध घटकांचा वाटा समजतो. अर्थव्यवस्थेतील आर्थिक विषमता कमी होत आहे की वाढत आहे याची या आकडेवारीवरून कल्पना येते.राष्ट्रीय उत्पन्नातील श्रमिकांचा वाटा वाढल्यास आर्थिक विषमता कमी झाल्याचे स्पष्ट होते.

HRMEconomicsSYBCOM

6.उपभोग बचत व गुंतवणूक संबंधी माहिती

राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी उप मुख्यबचत व गुंतवणुकीच्या परिणाम उपभोगाची पातळी ही समाजातील आर्थिककरण्याचे पातळी स्पष्ट करते. तर बचत व गुंतवणूक ही देशाची आर्थिक वृद्धी स्पष्ट करते .

7.आर्थिक धोरणाच्या निश्चितीसाठी उपयुक्त

सरकारला आर्थिक धोरणाची आखणी करताना राष्ट्रीय उत्पन्नविषयक आकडेवारी आवश्यक ठरते.देशाचे राष्ट्रीय उत्पन्न व त्याची विभागणी यासंबंधी अचूक व विश्वसनीय आकडेवारी उपलब्ध असल्याशिवाय सरकार योग्य वास्तववादी व समतोल आर्थिक धोरणाची आखणी करू शकत नाही.

8.आर्थिक योजनांच्या आखणीसाठी आवश्यक

जगातील बहुतेक सर्व देशांनी नियोजनबद्ध आर्थिक विकासाचा मार्ग स्वीकारलेला आहे. राष्ट्रीय उत्पन्न राष्ट्रीय उपभोग,राष्ट्रीय बचत व गुंतवणूक यासंबंधी अचूक आकडेवारी उपलब्ध असल्याशिवाय आर्थिक योजनांची आखणी करणे शक्य होत नाही.

HRMMEconomicsSYBCOM

9. विविध देशांच्या आर्थिक स्थितीची तुलना शक्य

जगातील विविध राष्ट्रांच्या आर्थिक स्थितीची त्या देशातील राहणीमानाची व आर्थिक कल्याणाची तुलना करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाची मदत होते.राष्ट्रीय उत्पन्नाची तुलना करून विविध देशातील राहणीमान व आर्थिक कल्याणाची तुलनात्मक स्थिती समजते .

10. संशोधकांना उपयुक्त

अर्थशास्त्रातील संशोधकांना संबंधित वेगवेगळ्या अभ्यासात राष्ट्रीय उत्पन्न विशेष आकडेवारीचा उपयोग होतो. उदाहरणार्थ आर्थिक कल्याण आर्थिक विषमता आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण यांसंबंधी अभ्यास करताना राष्ट्रीय उत्पन्नविषयक आकडेवारीचा उपयोग होऊ शकतो .

11.मागणी पुरवठा संबंधी अंदाज करण्यासाठी उपयोग

राष्ट्रीय उत्पन्नाच्या आधारे वस्तूवसेवांच्या एकूण पुरवठा याचा अंदाज करता येतो.उत्पन्नाच्या पातळीवर मागणी अवलंबून असल्याने राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीच्या आधारे मागणीसंबंधी अंदाज करता येतो.

HRMInternationalEcoSYBCOM

अशा प्रकारे राष्ट्रीय उत्पन्नविषयक आकडेवारी विविध दृष्टीने सरकार अर्थशास्त्राचे अभ्यासक व इतर अनेक घटकांना उपयोगी पडते त्यामुळे निरनिराळ्या देशात राष्ट्रीय उत्पन्नाची गणना केली जाते.

2.2 संकल्पना

राष्ट्रीय उत्पन्न विषयक संकल्पना पुढीलप्रमाणे

2.2.1 स्थुल राष्ट्रीय उत्पादन :-

"एका विशिष्ट कालखंडात साधारणपणे एक वर्ष देशातील नागरिकांनी उत्पादीत केलेल्या अंतिम वस्तु व सेवा यांचे उत्पादन म्हणजे स्थूल राष्ट्रीय उत्पादन होय."

यात अंतिम वस्तूंचे व सेवांचे उपभोग्य व भांडवली वस्तूंचा समावेश होतो.स्थूल राष्ट्रीय उत्पादन हे उत्पादन स्थान विचारात न घेता देशातील नागरिक व व्यावसायिकांनी उत्पादीत केलेल्या सर्व वस्तू आणि सेवांच्या चलनी मूल्यांचे मापन होय. राष्ट्रीय उत्पादनाची गणना करताना वैयक्तिक उपभोग खर्च, खाजगी देशांतर्गत गुंतवणूक, निव्वळ निर्यात आणि परदेशी गुंतवणुकीतून देशातील नागरिकांनी मिळवलेले कोणतेही उत्पन्नयांची बेरीज केली जाते आणि त्यातून परकीय नागरिकांनी देशांतर्गत अर्थव्यवस्थेमध्ये मिळवलेले उत्पन्न वजा केले जाते. देशाच्या निर्यातीतून आयात वजा केली असता निर्यात समजते .

स्थुल राष्ट्रीय उत्पादनाचे मोजमाप करताना दुहेरी गणना टाळण्यासाठी अर्थव्यवस्थेतील उत्पादित अंतिम वस्तू व सेवांचे पैशातील मूल्य विचारात घ्यावे लागते.अंतिम वस्तु म्हणजे अंतिमतः उपभोगासाठी वापरल्या जातात अशा वस्तू होय. संख्याशास्त्रीय दृष्टिकोनातून स्थुल राष्ट्रीय उत्पादनाचे मोजमाप हे निव्वळ राष्ट्रीय उत्पादनापेक्षा अधिक अचूक असते. कारण घसार्याचे मोजमाप करणे कठीण असते.स्थूल राष्ट्रीय उत्पादन विविध अर्थव्यवस्थांच्या सापेक्ष सामर्थ्याची तुलना करते आणि जगभरातील आर्थिक बदलांचे मोजमाप करण्याचा

HRM International Economics SYBCOM

आधार पुरवते. विशिष्ट काळातील स्थूल राष्ट्रीय उत्पादनातील वाढ अर्थव्यवस्थेच्या कामगिरीत सुधारणा होत असल्याचे स्पष्ट करते.

2.2.2 निव्वळ राष्ट्रीय उत्पादन :-

"एका विशिष्ट कालखंडात देशातील नागरिकांनी उत्पादित केलेल्या सर्व वस्तू व सेवांच्या निव्वळ उत्पादनाची बेरीज म्हणजे निव्वळ राष्ट्रीय उत्पादन होय."

स्थूल राष्ट्रीय उत्पादनातून घसारा वजा केला असता निव्वळ राष्ट्रीय उत्पादन समजते.निव्वळ राष्ट्रीय उत्पादन म्हणजे उपभोग्य वस्तू व सरकारी वस्तूंचे उत्पादन आणि निव्वळ गुंतवणूक यांची बेरीज होय.याचाच अर्थनिव्वळ राष्ट्रीय उत्पादन म्हणजे एकूण उपभोग्य वस्तूंचे उत्पादन आणि अर्थव्यवस्थेच्या भांडवल साठ्यातील निव्वळ वाढ यांची बेरीज होय. निव्वळ राष्ट्रीय उत्पादन म्हणजे दिलेल्या कालखंडात देशाच्या नागरिकांनी परदेशात आणि देशांतर्गत उत्पादित तयार वस्तू आणि सेवांचे चलनी मूल्य होय.

निव्वळ राष्ट्रीय उत्पादन हा देशाच्या एकूण उत्पादनाच्या उपयुक्त निर्देशक आहे.निव्वळ राष्ट्रीय उत्पादनाची संकल्पना ही वृद्धीच्या अर्थशास्त्राच्या अभ्यासात उपयुक्त आहे. मात्र या संकल्पनेत एक गंभीर स्वरूपाची उणीव आहे व ती म्हणजे निव्वळ राष्ट्रीय उत्पादनाच्या गणनेत सयंत्र इमारती यांसारख्या घसाऱ्याचे दर ठरविण्याबाबत गुंतागुंतीच्या व अवघड समस्या निर्माण होतात.

HRM Economics SYBCom

2.2.3.स्थूल देशांतर्गत उत्पादन :-

स्थूल देशांतर्गत उत्पादन हे देशाच्या एकूण आर्थिक व्यवहारांचे विस्तृत संख्यात्मक मापन आहे.स्थूल देशांतर्गत उत्पादन म्हणजे एका विशिष्ट कालखंडात देशाच्या भौगोलिक सीमेत उत्पादित वस्तू आणि सेवांचे अंतिम मूल्य होय. देशांतर्गत उत्पादन एका विशिष्टकालखंडात देशातील नागरिकांनी किंवा परकियांनी देशात उत्पादित केलेल्या सर्व वस्तू व सेवांचे मूल्य होय. अशा प्रकारे स्थूल देशांतर्गत उत्पादन अर्थव्यवस्थेतील वैयक्तिक उत्पन्न आणि उत्पादनाच्या प्रवाहाचे मापन करते.

स्थूल देशांतर्गत उत्पादन हे अर्थव्यवस्थेच्या आकाराचा आणि वृद्धीदाराचा अंदाज करण्यासाठी उपयोगी पडते. देशांतर्गत उत्पादनाची गणना, खर्च उत्पादन किंवा उत्पन्न यांचा वापर करून तीन प्रकारे केली जाते. स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या बाबतीत काही मर्यादा असल्या तरी ते धोरणकर्ते,गुंतवणूकदार आणि व्यवसायिक यांना धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे साधन आहे.

स्थूल देशांतर्गत उत्पादनाचा वृद्धी दर हा देशाच्या आर्थिक कामगिरीचा महत्त्वाचा निर्देशक आहे. देशांतर्गत उत्पादनातून वजा केला असता निव्वळ देशांतर्गत उत्पादन समजते.स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या आधारे देशांतर्गत उत्पादन काढायचे असल्यास राष्ट्रीय उत्पादनातून विदेशी व्यवहारातून मिळालेले निव्वळ उत्पन्न वजा करावे लागते.

HRMInternationalEconomicsSYBCOM

2.2.4 दरडोई उत्पन्न :-

दरडोई उत्पन्न हे विशिष्ट क्षेत्रात प्रति व्यक्ति मिळवलेल्या सरासरी उत्पन्नाचे मापन करते. क्षेत्राच्या एकूण उत्पन्नात त्यांच्या एकूण लोकसंख्याने भागले असता दरडोई उत्पन्न समजते. एकूण राष्ट्रीय उत्पन्नाला एकूण लोकसंख्येने भागले असता राष्ट्रीय उत्पन्न समजते.

एकूण देशांतर्गत उत्पादनास एकूण लोकसंख्येने भागले असता दरडोई स्थूल देशांतर्गत उत्पादन समजते. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली असता लोकांच्या राहणीमानात वाढ झाली आहे की नाही हे समजण्यासाठी दरडोई उत्पन्नाची संकल्पना महत्त्वाची आहे.दरडोई उत्पन्न राष्ट्रीय समृद्धीचे एक सार्वत्रिक मापन आहे.

दरडोई स्थूल देशांतर्गत उत्पादन हे प्रत्येक नागरिकांना किती आर्थिक उत्पादन मूल्य मिळू शकते ते दर्शवते.अर्थव्यवस्था लोकसंख्येचे सह कशी वाढत आहे हे समजण्यासाठी सरकार दरडोई स्थूल देशांतर्गत उत्पादनाचा वापर करू शकते. दरडोई स्थूल देशांतर्गत उत्पादनाचे जागतिक विश्लेषण जगातील आर्थिकसमृद्धी आणि आर्थिक घडामोडींविषयी तुलनात्मक माहिती उपलब्ध करण्यात मदत करते.

HRMInternationalSYBCom

2.2.5 वैयक्तिक किंवा व्यक्तिगत उत्पन्न :-

एका वर्षाच्या कालखंडात व्यक्ती किंवा कुटुंबांना सर्व मार्गांनी प्रत्यक्ष मिळालेल्या उत्पन्नाची बेरीज म्हणजे वैयक्तिक किंवा व्यक्तिगत उत्पन्न होय. यात खंड,व्याज,वेतन,नफाअशा घटकांना मिळणाऱ्या मोबदल्याचा आणि पेन्शन, बेकारीभत्ता अशा हस्तांतरित उत्पन्नाचा समावेश होतो.

वैयक्तिक उत्पन्न हे कुटुंबाच्या उत्पन्नाची विस्तृतमापन सूचित करते. ते ग्राहकांच्या खरेदी शक्तीचे मोजमाप करते.वैयक्तिक उत्पन्न आर्थिक विस्ताराच्या काळात वाढ आणि आर्थिक घसरणीच्या काळात घट होऊ शकते.वैयक्तिक उत्पन्नाचा ग्राहकांच्या उपभोगावर मोठा परिणाम होतो.

2.2.6 खर्च करण्याजोगे किंवा विनियोगक्षम उत्पन्न

व्यक्तींना मिळालेले सर्वच्या सर्व उत्पन्न व्यक्ती आपल्या मनाप्रमाणे खर्च करू शकत नाही. कारण या उत्पन्नातून व्यक्तींना व्यक्तिगत प्रत्यक्ष कर द्यावे लागतात. प्रत्यक्ष व्यक्तिगत कर दिल्यानंतर उरलेले उत्पन्न व्यक्ती आपल्या इच्छेप्रमाणे खर्च करू शकतात. मात्र खर्च करण्याजोगी उत्पन्न उपभोगासाठी खर्च केले पाहिजे असे नाही. स्थूलमानाने व्यक्ती आपल्या खर्च करण्याजोग्या उत्पन्नापैकी फार मोठा भाग उपभोगावर खर्च करतात आणि उर्वरित रकमेची बचत करतात.

HRMMEconomicsSYBCOM

वैयक्तिक किंवा व्यक्तिगत उत्पन्नातून वैयक्तिक कर वजा केले असता खर्च करण्याजोगे किंवा विनियोगक्षम उत्पन्न समजते. खर्च करण्याजोगे वैयक्तिक उत्पन्न म्हणजे वैयक्तिक उत्पन्न वजा वैयक्तिक पातळीवरील कर होय. ते कुटुंबांनी त्यांचे सर्व कर दिल्यानंतर उरलेल्या निव्वळ उत्पन्नाचे प्रमाण मोजते. खर्च करण्याजोगे वैयक्तिक उत्पन्न हे कुटुंबे वस्तू आणि सेवांवर खर्च करू शकतील किंवा गुंतवणुकीसाठी बचत करु शकतील अशी रक्कम दर्शवते.

खर्च करण्याजोगे वैयक्तिक उत्पन्न हे कुटुंबाच्या वित्तीय साधनसामग्रीचे एक महत्वाचे मापन आहे. ही अर्थशास्त्रज्ञ खर्च करण्याजोग्या वैयक्तिक उत्पन्नाचा वापर कुटुंबाचा बचत व खर्चाचा दर निश्चित करण्याचा आरंभबिंदू म्हणून करतात. खर्च करण्याजोगे उत्पन्न हे कुटुंब क्षेत्राला मिळालेल्या उत्पन्नापैकी प्रत्यक्षात खर्चासाठी उपलब्ध असलेल्या रकमेची माहिती पुरवते अर्थव्यवस्थेची एकूण स्थिती मोजण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या अनेक प्रमुख आर्थिक निर्देशांक पैकी एक म्हणून खर्च करण्याजोगी वैयक्तिक उत्पन्न विचारात घेतले जाते.

राष्ट्रीय उत्पन्नाची गणना : पद्धती व अडचणी

राष्ट्रीय उत्पन्नाची संकल्पना अनेक दृष्टीने महत्त्वाचे असल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करणे आवश्यक ठरते. राष्ट्रीय उत्पन्नाच्या संकल्पनेतून तीन स्पष्टीकरणे मिळतात.

HRMInternationalFEBCOMS

1.राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे अर्थव्यवस्थेतील एकूण वार्षिक उत्पादनाचे पैशातील मूल्य होय.

2. राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे देशातील एकूण उत्पन्न होय.

3. राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे अर्थव्यवस्थेतील एकूण खर्च होय.

अशा तीन पैकी कोणत्याही दृष्टीने राष्ट्रीय उत्पन्नाकडे पाहिल्यास मिळणारा परिणाम सारखाच असतो.याचे कारण असे की,प्रत्येक खर्च हा त्याचवेळी प्राप्तीही असतो आणि खर्च व प्राप्ती हे दोन्ही खरेदीदार व विक्रेतेयांच्यातील विनिमय झालेल्या वस्तू व सेवांच्या मूल्यबरोबर असतात. यातूनच राष्ट्रीय उत्पन्न करण्याच्या विविध पद्धती निर्माण होतात. राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना पुढील विविध पद्धतींचा उपयोग केला जातो.

HRMInternationalSYBCOM Economics

आकृती



1.उत्पादन पद्धती

Production Method

उत्पादन पद्धतीनुसार अर्थव्यवस्थेतील कोणत्याही एका वर्षातील अंतिम वस्तू व सेवांच्या एकूण उत्पादनाचे मुल्य पैशात मोजले जाते.अंतिम वस्तू व सेवांच्या एकूण उत्पादनाला त्यांच्या प्रत्येकाच्या बाजारातील किमतीने गूणून राष्ट्रीय उत्पादन मिळते.उत्पादन पद्धतीच्या आधारे अर्थव्यवस्थेतील शेती, उद्योग,

व्यापार,वाहतूक, दळणवळण अशा विविध क्षेत्रात उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांची किंमत ठरवून त्या किंमतीची बेरीज केली जाते.

2. उत्पन्न पद्धती

Income Method

राष्ट्रीय उत्पन्न गणनेचीही दुसरी पद्धती असून, यापद्धतीनुसार उत्पादनाच्या प्रक्रियेत सहभागी झालेल्या सर्व उत्पादन घटकांना मिळणाऱ्या उत्पन्नाची बेरीज म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय.उत्पादनप्रक्रियेत भूमी,श्रम, भांडवलवसंयोजक असे घटक सहभागी होतात. या उत्पादन घटकांना मिळणाऱ्या मोबदल्याची बेरीज केली असता राष्ट्रीय उत्पन्न समजते.यालाच घटकखर्चानुसार राष्ट्रीय उत्पन्न असेही म्हणतात.

3.खर्च पद्धती

Expenditure Method

राष्ट्रीय उत्पन्न गणनेची ही तिसरी पद्धती आहे. यापद्धतीनुसार देशातील कुटुंबे,व्यवसायसंस्था आणि सरकार यांनी केलेल्या विशिष्ट वर्षातील खर्चाची बेरीज करुन राष्ट्रीय उत्पन्न मिळते. यापद्धतीच्या आधारे राष्ट्रीय उत्पन्न मोजताना पुढील चार प्रकारचा खर्च विचारात घेऊन त्या खर्चाची बेरीज केली जाते.

HRMInternationalSYECOM

अ. वैयक्तिक उपभोग खर्च

Personal Consumption Expenditure

देशातील व्यक्तीने उपभोग्य वस्तू व सेवा विकत घेण्यासाठी केलेला खर्च म्हणजे वैयक्तिक उपभोग खर्च होय.

ब. स्थूल देशांतर्गत खाजगी गुंतवणूक

Gross Domestic Private Investment

उत्पादन कार्यात सहभागी झालेल्या व्यवसाय संस्था,नवीन यंत्रे, अवजारे, खरेदी करण्यासाठी व त्यांच्या देखभालीसाठी जो खर्च करतात त्या सर्व खर्चाची बेरीज म्हणजे स्थुल देशांतर्गत खाजगी गुंतवणूक खर्च होय.

क.वस्तू व सेवांची सरकारकडून होणारी खरेदी

Government Purchase of Goods And Services

सरकारकडून विविध प्रकारच्या वस्तू व सेवांची खरेदी केली जात असते. ही खरेदी चालून उपभोगासाठी असते. तसेच ती भांडवली कारणासाठी देखील असते.

HRMEconomicsSYBCOM

ड.निव्वळ परकीय गुंतवणूक

Net Foreign Investment

देशातील नागरिकांनी परकीय वस्तू व सेवांवर केलेला खर्च आणि नागरिकांनी देशातील वस्तू व सेवांवर केलेला खर्च यातील फरकास निव्वळ गुंतवणूक खर्च असे म्हणतात.

या चार प्रकारच्या खर्चाची बेरीज केली असता राष्ट्रीय उत्पन्न समजते व त्यास बाजारातील किमतीनुसार राष्ट्रीय उत्पादन म्हणतात.

राष्ट्रीय उत्पन्न यांच्यावरील प्रमुख तीन पद्धती व्यतिरिक्त आणखी ही एक पद्धत आहे व ती म्हणजे मूल्य वृद्धी पद्धती होय.या पद्धतीनुसार उत्पादनाच्या प्रत्येक अवस्थेला असलेले राष्ट्रीय उत्पादनाचे मुल्य आणि आधाराचे मूल्य यातील फरक म्हणजे मूल्यवृद्धी होय.

अशाप्रकारे निरनिराळ्या पद्धतींच्या आधारे राष्ट्रीय उत्पन्नाची गणना केली जाते. देशातील राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना एकाचवेळी एकापेक्षा जास्त पद्धतीचाही उपयोग केला जातो.भारतात राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना राष्ट्रीय उत्पन्न उत्पादन पद्धती व उत्पन्न पद्धतीचा प्रामुख्याने उपयोग केलेला दिसून येतो. राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना उत्पादन पध्दती व उत्पन्न पध्दतीचा उपयोग केलेला दिसतो.

HRM Economics SYBCOM

राष्ट्रीय उत्पन्नगणनेतील अडचणी

(Difficulties in measurement of National Income)

राष्ट्रीय उत्पन्नाचे गणना करताना एका वर्षाच्या कालावधीत देशातील सर्व उत्पादक क्षेत्रात निर्माण झालेल्या वस्तू व सेवांची मोजमाप केले जाते. असे मोजमाप करताना कोणत्याही वस्तू व सेवांची दुहेरी गणना होणार नाही याची काळजी घ्यावी लागते. देशात हजारो वस्तू व सेवांचे उत्पादन होत असते. त्यांची गणना करणे अनेकदा अडचणीचे असते. विकसित देशात अविकसित देशांच्या तुलनेत राष्ट्रीय उत्पन्न गणना करताना कमी अडचणी येतात. भारतासारख्या अल्पविकसित देशात राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना अनेक अडचणी येतात. या अडचणी पुढीलप्रमाणे आहेत.

HRMInternationalSYBComEcoM

संकल्पनात्मक अडचणी

Conceptual Difficulties

राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना 'राष्ट्रीयउत्पन्न' या संज्ञेचा निश्चित अर्थ विचारात घेणे गरजेचे असते.त्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नात कोणत्या वस्तू व सेवांचा समावेश करावयाचा आणि कोणत्या वस्तू व सेवांचा समावेश करावयाचा नाही हे ठरवावे लागते. मात्र ठरवणे अवघड असल्याने याबाबत अडचणी निर्माण होतात. या अडचणी पुढीलप्रमाणे–

1. सेवांच्या समावेशाची अडचण

राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना देशातील एका वर्षाच्या कालावधीत उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांची बेरीज केली जाते. वस्तूचे मोजमाप करणे शक्य असते. मात्र सेवांची गणना करताना अडचण येते. राष्ट्रीय उत्पन्नात कोणत्या सेवांचा समावेश करावा हे ठरवण्याचा प्रश्न निर्माण होतो. या सेवांचे मूल्य पैशात व्यक्त करता येते. किंवा ज्या सेवांचा पैशाची विनिमय होतो त्यांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जातो. मात्र पैसा न घेता दिलेल्या सेवांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जात नाही. वास्तविक त्यांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात व्हायला हवा मात्र त्यांचे मोजमाप करणे अडचणीचे असल्यामुळे त्या वगळावे लागतात.

2. बेकायदेशीर व्यवहार

काळ्याबाजाराच्या माध्यमातून होणाऱ्या व्यवहारांची नोंद घेता येत नाही. ते कायदेशीर रीतीने असे व्यवहार होत असतात.गैरव्यवहारांची नोंद घेतली जात नसल्याने सर्व आर्थिक व्यवहारांचे मापन करता येतनाही. चोरट्या मार्गाने देशात अनेक वस्तू येतात, नोंदणी न करता हि खूप मोठ्या प्रमाणावर व्यवहार होतात. त्यामुळे अनेक व्यवहारांचे प्रतिबिंब राष्ट्रीय उत्पन्नात पडत नाही. सर्व व्यवहारांचे मापन करता येत नसल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाचे योग्य मापन केले जाण्यात अडचण येते.

HRMEconomics SYBCOM

3.हस्तांतरित उत्पन्न

काही व्यक्तींना उत्पादन कार्यात सहभागी न होता हे उत्पन्न मिळत असते. पेन्शन, बेकारी भत्ता या स्वरूपातील हस्तांतरित उत्पन्न सरकारकडून लोकांना मिळत असते. अशा हस्तांतरित उत्पन्नाचा व राष्ट्रीय उत्पन्नात करावयाचा की नाही हा प्रश्न निर्माण होतो.कोणत्याही उत्पादन कार्यात सहभागी न होता हे उत्पन्न मिळत असल्याने त्यांचा समावेश न करणे योग्य असले तरी हे उत्पन्न खर्च केल्यावर आर्थिक व्यवहारात वाढ होते. त्यामुळे त्यांचा समावेश करणेही आवश्यक ठरते.

4. सरकारच्या सेवा

सरकारच्या सेवांमध्ये सरकारकडून वाहतूक, दळणवळण अशा अनेक प्रकारच्या सेवा सुविधा पुरवल्या जातात. सरकारच्या सेवांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करावयाचा की नाही हे ठरवण्याच्याबाबतीत अडचण निर्माण होते. सरकारकडून पुरवण्यात आलेल्या सेवांचा वापर उपभोक्ते व उत्पादक यांच्याकडून केला जातो. सरकारकडून उपभोक्त्यांना मिळणाऱ्या राष्ट्रीय सेवांचा उत्पन्नात समावेश करणे आणि उत्पादकांकडून वापरल्या जाणाऱ्या सेवा वगळणे योग्य असते. मात्र या सेवा दोन्ही घटकांकडून एकाच वेळी वापरण्यात येत असल्याने कोणत्या सेवा वगळाव्यात हे ठरवणे अवघड असते.

HRMMtEconomicsSYBCOM

ब. व्यावहारिक अडचणी

राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना संकल्पनात्मक अडचणीबरोबर अनेक व्यावहारिक अडचणी निर्माण होतात. भारतासारख्या विकसनशील देशात मोठ्या प्रमाणात व्यावहारिक अडचणी निर्माण होतात. व्यावहारिक अडचणीयांची ही माहिती पुढीलप्रमाणे-

1. दुहेरी गणनेची समस्या -

राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना एका वस्तूची दोनदा गणना होणार नाही. याची काळजी घ्यावी लागते.त्यासाठी अंतिम वस्तूंची गणना करावी लागते. एकच वस्तू दोनदा मोजली जाणे दोषपूर्ण ठरते. कापसाची गणना शेती क्षेत्रातील उत्पादन म्हणून केली तर त्यापासून तयार होणाऱ्या सुताची किंमत राष्ट्रीय उत्पन्नात समाविष्ट करणे चुकीचे ठरते. प्रत्यक्षात अशी दुहेरी गणना टाळून राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करणे अवघड व अडचणीचे असते.

2. वस्तुविनिमय व्यवहारांचे अस्तित्व–

राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना मोठ्या प्रमाणावर वस्तू व सेवांची पैशाची विनिमय होतो असे मानले जाते.मात्र भारतासारख्या देशात शेती क्षेत्र हे महत्त्वाचे क्षेत्र असून, येथील शेतकरी चरितार्थाचेसा धन म्हणून शेतीकडे पाहतात. त्यामुळे त्यांनी उत्पादीत केलेल्या शेतीमालापैकी बराचसा

HRMMfEcoSYBCOM

शेतमाल स्वतःच्या उपयोगासाठी वापरला जातो किंवा इतर वस्तूंच्या बदल्यात त्यांचा विनिमय केला जातो. हे सर्व उत्पादन वगळले तर राष्ट्रीय उत्पन्न खूपच कमी येईल. शेतकऱ्यांनी स्वतःच्या उपभोगासाठी वापरलेल्या उत्पादनाचे मोजमाप करण्यासाठी सध्यातरी कोणतीही वस्तुनिष्ठपद्धती अस्तित्वात नाही.

3.व्यवसायानुसार उत्पन्न घेण्यात अडचण–

राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना वेगवेगळ्या व्यवसायात निर्माण झालेल्या उत्पन्नाचे मोजमाप केले जाते. परंतु व्यक्तीच्या उत्पन्नाची विभागणी व्यवसायानुसार करण्यात अडचण येते. भारतात शेती व्यवसायाचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा महत्त्वाचा आहे. शेतकरी शेती करतो त्यामुळे त्याचे उत्पन्न शेती या व्यवसायातील उत्पन्न म्हणतायेते. मात्र, शेती व्यवसाय हा हंगाम स्वरूपाचा असल्याने शेतकरी इतरत्रही काम करताना दिसतात. ते रोजगार हमीयोजनेच्या कामावर काम करतात. आपल्याकडील बैलगाडीच्या मदतीने ते इतरांच्या मालाची वाहतूक करतात. घरगुती स्वरूपाचे इतर छोटे व्यवसायही करतात. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नाची व्यवसायानुसार गणना करण्यात अडचण येते. देशातील शेतकऱ्यांची व असे वेगवेगळे व्यवसाय करणाऱ्यांची संख्या मोठी असल्याने राष्ट्रीय उत्पन्न गणना करताना अडचण येते.

HRMM EconomicsSYBCOM

3. असंघटित क्षेत्राचे अस्तित्व–

भारतीय अर्थव्यवस्था संघटित व असंघटित अशा दोन भागात विभागलेले आहे. संघटित क्षेत्रातील उत्पन्नासंबंधी माहिती घेणे शक्य असते कारण या क्षेत्रातील उत्पन्नासंबंधी व खर्चासंबंधी सविस्तर व पद्धतशीर नोंद ठेवलेली असते. मात्र, असंघटित क्षेत्रातील उत्पन्नासंबंधी पद्धतशीरपणे ठेवलेल्या नोंदींचा अभाव असतो. लाखो शेतकरी,कारागीर, छोटे व्यावसायिक उपजीविकेचे साधन म्हणून व्यवसाय करतात. शेतकरी उत्पादित केलेल्या मालापैकी बराचसा माल स्वतःच्या उपभोगासाठी वापरतात. वित्तपुरवठ्याच्या क्षेत्रात सावकार, सराफी पेढी वाले यांचाअसंघटित क्षेत्रांमध्ये समावेश होतो.

शेतकऱ्यांकडून वस्तूविनिमयाचे व्यवहार होतात. विक्रीसाठी बाजारात आणला जाणारा शेतमाल मर्यादित असतो, भारतात असंघटित क्षेत्र मोठे असल्याने आणि असंघटित क्षेत्रातील उत्पन्नाचे मोजमाप करणे कठीण असल्याने राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करण्यात अडचण येते.

4. हिशेब ठेवणा-यांचे अल्पप्रमाण -

आपल्या उत्पन्नाचा व खर्चाचा हिशेब ठेवण्याची प्रवृत्ती भारतात मोठ्या प्रमाणावर आहे. देशात घरगुती स्वरूपात अनेक उद्योगांत उत्पादन केले जाते. तसेच अनेक लहान उत्पादक निरनिराळ्या वस्तूंचे उत्पादन करतात. त्यांच्याकडून

HRMteconomicsSYBCOM

उत्पन्न व खर्चाविषयीची पद्धतशीरपणे नोंद ठेवली जात नाही. भारतातील ग्रामीण भागात निरक्षरतेचे प्रमाण खूप मोठे आहे.ग्रामीण भागातील शेतकरी आपल्या उत्पन्नाचा व खर्चाचा हिशेब ठेवत नाही. त्यामुळे त्यांचे उत्पन्न निश्चित करणे व त्यांची गणना करणे अवघड होते.

राष्ट्रीयउत्पन्नाचीगणनाकरतानादेशातीलसर्वउत्पादकक्षेत्रातीलउत्पन्नाचीमाहितीद्यावीलागते. मात्रशेतकरी ,छोटेउत्पादकयांच्याउत्पन्नाचीमाहितीमिळतनाही,त्यामुळेराष्ट्रीयउत्पन्नमोजण्याच्य ाअडचणीनिर्माणहोते.

5. आकडेवारीच्या उपलब्धतेची अडचण

राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना विविध बाबींसंबंधी माहिती उपलब्ध व्हावी लागते. उत्पन्न पद्धतीच्या आधारे उत्पन्न गणना करताना देशातील सर्व व्यक्तींच्या सर्वमार्गाने मिळणाऱ्या उत्पन्नाची बेरीज करावी लागते. शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा अचूक अंदाज घेता येत नाही.तसेच अनेक व्यावसायिकही आपले खरे उत्पन्न दाखवीत नाही. कर चुकवण्यासाठी उत्पन्न कमी दाखवले जाते. व्यक्ती किंवा कुटुंबाच्या उत्पन्नाच्या वाटणी संबंधित आकडेवारी उपलब्ध होण्यातही अडचणअसते.त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नगणनेत अडचण येते.

HRMEconomicsSYBCOM

2.4 उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह : द्विक्षेत्र प्रतिमान

(Circular Flow of Income : Two Sector Model)

उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह म्हणजे अशी प्रक्रिया की, ज्याद्वारे अर्थव्यवस्थेचे राष्ट्रीय उत्पन्न चक्राकार पद्धतीने सतत फिरत असते. कुटुंबे व्यवसाय संस्थांना आर्थिक साधनसामग्रीचा किंवा घटकांचा पुरवठा करतात त्याबद्दल कुटुंबांना पैशांच्या स्वरूपात मोबदला मिळतो. अर्थव्यवस्थेत उत्पादक घटक आणि वस्तू व सेवा यांच्या प्रवाहाबरोबरच पैशाचाही प्रवाह चालू असतो. एकाचवेळी चलनी प्रवाह व वास्तव प्रवाह चालू असतात. मात्र हे दोन्ही प्रवाह एकमेकांच्या विरोधी असतात. चक्राकार प्रवाहची संकल्पना अनेक दृष्टीने महत्त्वाची आहे. या संकल्पनेचे महत्त्व पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

1.अर्थव्यवस्थेच्या कार्यांची माहिती

चक्राकार प्रवाहाची संकल्पना अर्थव्यवस्थेचे चित्र अधिक काटेकोरपणे स्पष्ट करते. अर्थव्यवस्था कार्यक्षमपणे कार्य करीत आहे की नाही याची यावरून कल्पना येते. त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेच्या कार्यात काही अडचणी असतील तर त्यांचीही माहिती यातून मिळते.

HRMEconomicsSYBCOM

2. असमतोलाच्या समस्येचा अभ्यास

चक्राकार प्रवाहाच्या आधारे असमतोलाच्या प्रश्नाचा किंवा समस्येचा अभ्यास करता येतो. असमतोल का झालेला आहे याची माहिती कल्पना येते. तसेच पुन्हा समजून कसा प्रस्थापित करता येईल याचीही माहिती मिळते.

3. चलनविषयक धोरणाचे महत्त्व स्पष्ट

उत्पन्नाचा चक्राकार प्रवाहाचा अभ्यास अर्थव्यवस्थेतील बचत व गुंतवणूक यात समानता प्रस्थापित करण्याच्या बाबतीतील चलनविषयक धोरणाच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकतो. वित्तीय बाजारामार्फत बचत गुंतवणूकीत समानता प्रस्थापित होते. या बाजारावर चलनविषयक धोरणाद्वारे नियंत्रण ठेवले जाते.

4. राजकोषीय धोरणाचे महत्त्व स्पष्ट

उत्पन्नाचा व खर्चाचा चक्राकार प्रवाह राजकोषीय धोरणाचे महत्त्वही स्पष्ट करतो. राष्ट्रीय उत्पन्न समतोलात असण्यासाठी अपेक्षित बचत अधिक कर हेअपेक्षित गुंतवणूक अधिक सरकारी खर्च याबरोबर असले पाहिजे. बचत व कर की उत्पन्नप्रवाहातील गळती तरअपेक्षित गुंतवणूक व सरकारी खर्च आणि उत्पन्न प्रवाहातील भर होय.उत्पन्नाच्या चक्राकारप्रवाहाच्या समतोलासाठी गळती व भर

HRMMEconomicsSYBCOM

समान असली पाहिजे. तशी ती नसेल तर सरकारला कर, खर्च यात बदल करून समानता राखण्याचा प्रयत्न करावा लागतो.

5. चक्राकार प्रवाहातील गळतीची कल्पना

उत्पन्नाच्या चक्राकारप्रवाहातील गळती कोणत्या गोष्टीमुळे होती याची कल्पना चक्राकार प्रवाहाच्या संकल्पनेमुळे येते. उत्पन्नप्रवाहातील गळती थांबवण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. उदा. आयातही उत्पन्न प्रवाहातील गळती आहे. असे गळती थांबवण्यासाठी सरकारला आयात कमी आणि निर्यात वाढ करण्यासाठी प्रयत्न करावे लागतात.

6. चक्राकार प्रवाहातील भर समजते

उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहात कोणत्या बाबींमुळे भर पडते हे समजणे आवश्यक असते. उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह समतोल राहण्यासाठी याप्रवाहातील गळती रोखणे आवश्यक असते. तसेच चक्राकार प्रवाहात पडणारी भरही वाढणे आवश्यक असते. गुंतवणूक,निर्यात, सरकारीखर्च यामुळे चक्राकार प्रवाहात भर पडते.

अशाप्रकारे अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने चक्राकार प्रवाहाची संकल्पना महत्त्वाची आहे. अर्थव्यवस्था कशाप्रकारे कार्य करते याची आणि अर्थव्यवस्थेच्या

HRMMEconomicsSYBCOMS

अर्थव्यवस्थेच्या बाबतीतील असमतोलाच्या प्रश्नाची या संकल्पनेमुळे माहिती मिळते.

कुटुंबे आणि व्यवसाय संस्थायातील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह :
(Circular Flow of Income between Households and Firms)

अर्थव्यवस्थेत घरगुती किंवा कौटुंबिक क्षेत्र आणि व्यवसायक्षेत्र अशी दोनच क्षेत्र असलेल्या काल्पनिक अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाहाची माहिती घेता येते. भूमी, श्रम ,भांडवल ,संयोजन या उत्पादक घटकांची मालकी कुटुंबाकडे असते.कुटुंबांना या घटकांच्या सेवा विकून उत्पन्न मिळते.कुटुंबाकडून मिळणाऱ्या उत्पादनघटकांच्या आधारे व्यवसायसंस्था वस्तू व सेवा यांचे उत्पादन करतात व त्या कुटुंबांना किंवा उपभोक्त्यांना पुरवतात. अशाप्रकारे कुटुंबक्षेत्र हे व्यवसायक्षेत्राकडून त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तू विकत घेते. दोनच क्षेत्र असलेल्या अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह खालील आकृतीमध्ये दर्शवलेला आहे.

HRMEducationSYBCOM

आकृती



कुटुंबे, व्यवसायसंस्था, भूमी, श्रम, भांडवल व संयोजन कौशल्य घटकांचा मोबदला खंड,वेतन,व्याज व नफा उपभोग खर्च वस्तू व सेवा कुटुंबे व व्यवसाय संस्थायातील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह

HRMInteraction.com

घरगुती क्षेत्र आणि व्यवसायक्षेत्र किंवा कुटुंबे व व्यवसाय संस्था हे दोन क्षेत्र असलेल्या अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकारप्रवाह आकृतीमध्ये दाखवलेला आहे.

आकृतीत उत्पादन साधनसामग्री आणि वस्तू व सेवा यांचा वास्तव प्रवाह दाखवलाआहे, आकृतीत वरील बाजूस भूमी, श्रम, भांडवल व संयोजन कौशल्य या घटकांचा प्रवाह कुटुंबाकडून व्यवसायसंस्थांकडे जातो. तर उलट दिशेने खंड,

वेतन ,व्याज व नफा अशा घटकांच्या मोबदल्याच्या स्वरूपातील चलनी प्रवाह व्यवसाय संस्थांकडून कुटुंबाकडे गेलेला दिसतो.

आकृतीत खालच्या भागात वस्तू व सेवांवर कुटुंबांनी केलेल्या खर्चाच्या रूपाने चलनी प्रवाह कुटुंबाकडून व्यवसाय संस्थांकडे आणि वस्तू व सेवांचा प्रवाह विरुद्ध दिशेने व्यवसायसंस्थांकडून कुटुंबांकडे गेलेला आहे.

पैशाचा किंवा चलनी प्रवाह घटकांच्या मोबदल्याच्या रूपात व्यवसाय संस्थांकडून कुटुंबाकडे जातो आणि उपभोग खर्चाच्या रूपाने हा प्रवाह परत व्यवसाय संस्थांकडे जातो. उत्पन्नाचा किंवा पैशाचा हा चक्राकार प्रवाह वर्षानुवर्षे सातत्याने चालू असतो.

उत्पन्नाचा चक्राकार प्रवाहाचा आकार नेहमीच स्थिर राहत नाही.मंदीच्या काळात या प्रवाहाचा संकोच होतो.तर तेजीच्या काळात हा प्रवाह वाढलेला दिसून येतो.

HRMMEconomicsSYBCOM

विश्लेषण अधिक सोपे व्हावे यासाठी पुढील काही गोष्टी गृहीत धरलेल्या आहेत.

1.कुटुंबे आपल्या उत्पन्नातून बचत करत नाहीत व व्यवसायसंस्था त्यांच्या नफ्यातील भागाची बचत करत नाहीत.

2. अर्थव्यवस्थेत सरकार कोणतीही भूमिका पार पाडत नाही.सरकारला लोकांकडून करांच्या रूपाने पैसा मिळत नाही. तसेच सरकार व्यवसाय संस्थांनी उत्पादित केलेल्या वस्तू व सेवां करआकारणी करत नाही.

3. वस्तू व सेवांची आयात किंवा निर्यात केली जात नाही.

बचत व गुंतवणूकीसह चक्राकार प्रवाह

(The Circular Flow with Saving and Investment)

कुटुंबे आपल्याला मिळालेले सर्व उत्पन्न खर्च करतात असे वरील विवेचनात मानले आहे. प्रत्यक्ष व्यवहारात असे आढळत नाही. प्रत्यक्षातील अर्थव्यवस्थेत उत्पन्नाचा चक्राकार प्रवाहातून उत्पन्नाची गळती होत असते. तसेच उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहात भर पडत असते. बचतही उत्पन्नाचा चक्राकार प्रवाहातील गळती होय तर गुंतवणूक ही या प्रवाहातील भर होय.

HRMMEconomicsSYBCOM

जेव्हा कुटुंबे आपल्या उत्पन्नातील काही भागाची बचत करतात तेव्हा त्यांच्या बचतीचा उत्पन्नाचा चक्राकार प्रवाहावर परिणाम होतो. जेव्हा अधिक बचत केली जाते तेव्हा वस्तू व सेवांवरील खर्च कमी होऊन व्यवसायसंस्थांकडे जाणारा पैशाचा प्रवाह कमी होतो. व्यवसायसंस्थांना कमी पैसा मिळाल्याने ते कमी घटकांना उत्पादन कार्यात घेतात. त्यामुळे घटकांना देण्यात येणारा मोबदला कमी प्रमाणात दिला जातो. कुटुंबाच्या एकूण उत्पन्नात घट होते बचतीमुळे अर्थव्यवस्थेतील एकूण उत्पन्न प्रवाह कमी होत असल्याने अर्थशास्त्रज्ञ बचतीस पैशाच्या खर्चप्रवाहातील गळती मानतात.

कुटुंबे आपल्या बचतीबँ का,विमाकंपन्या, वित्तीयगृहे किंवा इतर वित्तीय संस्थात ठेवतात. या सर्व संस्थांना एकत्रितपणे वित्तीय संस्था किंवा वित्तीयबाजार असे म्हणतात. सर्वबचती वित्तीय बाजारात येतात असे येथे मानलेले आहे. तसेच कुटुंबा-कुटुंबांतर्गत कर्जव्यवहार होत नाहीत असे गृहीत धरलेले आहे.

व्यवसायसंस्था यंत्रसामग्री,कारखाने, हत्यारे यांसारख्या भांडवली वस्तूंच्या खरेदीसाठी वित्तीय बाजारातून कर्ज घेतले जातात.उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी व्यवसाय संस्था गुंतवणूक करतात. बचतीच्या रूपाने चक्राकार प्रवाहातून बाहेर गेलेले उत्पन्न वित्तीय बाजारात येऊन गुंतवणुकीच्या माध्यमातून पुन्हा उत्पन्न प्रवाहात येते. त्यामुळे उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह पूर्ववत चालू राहतो. हे आकृती च्या सहाय्याने अधिक योग्य प्रकारे स्पष्ट होईल.

HRMTeamEconomicsSYBCOM

आकृती



मध्यभागी वित्तीय बाजार दर्शवला आहे. कुटुंबाच्या बचती वित्तीय बाजारात येतात. व्यवसायसंस्था वित्तीय बाजारातून कर्ज घेऊन गुंतवणूक करतात. त्यामुळे बचतीच्या रूपाने उत्पन्न प्रवाहातून बाहेर पडलेला पैसा गुंतवणुकीच्या रूपाने पुन्हा प्रवाहात येऊन प्रवाह पूर्वीप्रमाणे चालू राहतो.

HRM Economics

संदर्भसूची

2.व्यवसायिक अर्थशास्त्र (समग्रलक्षी)पब्लिकेशन प्रा. डॉ.राजेंद्र अ.रसाळ जून 2020.

HRMInternationalEcoSYBCOM